आदिवासी विकास विभाग
महाराष्ट्र शासन
दूरध्वनी क्र. ०२५३-२५७७५१०, २५७४२३५, २५७५६१५

# महाराष्ट्र शासन
## आदिवासी विकास आयुक्तालय
## महाराष्ट्र राज्य, नाशिक

आदिवासी विकास भवन, १ ला मजला, गडकरी चौक,
जुना आग्रा रोड, नाशिक-४२२००२
Email admntd.nsk-mh@gov.in

जा.क्र.प्रशा-२०२४/प्र.क्र.५९/का.२(२)/ दिनांक : ११ जून, २०२४

## जाहीर प्रगटन

आदिवासी विकास विभागा मार्फत जाहीर प्रगटन करण्यात येते की, आयुक्त, आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य नाशिक यांचे स्तरावरुन दिनांक २३.११.२०२३ रोजी आदिवासी विकास विभागामधील ६०२ विविध रिक्त पदांकरिता जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती. व त्यानुसार दिनांक २३.११.२०२३ ते १३.१२.२०२३ या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आलेले होते. सदर विविध पदांकरीता उमेदवारांची ऑनलाईन पध्दतीने अर्ज प्राप्त झालेले आहेत.

तथापि, सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ अन्वये सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासवर्ग(एसईबीसी) (Socially and Educationally Backward Classes) (SEBC) या संवर्गाचा समावेश करुन जाहिरात पुनश्च प्रसिध्द करणे क्रमप्राप्त आहे. त्यानुसार पुनश्च बिंदूनामावली अद्ययावत करुन गट-क संवर्गासाठी पुनश्च जाहीरात प्रसिध्द करण्याबाबत शासन स्तरावरुन सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

तरी, आदिवासी विकास विभागाची दिनांक २३.११.२०२३ रोजी दिलेली जाहिरात तुर्तास स्थगित करण्यात येत आहे. यांची नोंद सर्व अर्ज भरलेल्या उमेदवारांनी घ्यावी. याबाबत आदिवासी विकास विभागातील क्षेत्रीय कार्यालयाकडून पुनश्च बिंदूनामावली अद्ययावत करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर बिंदूनामावली अद्ययावत झाल्यानंतर हया बाबतची पुढील कार्यवाही सविस्तर कळविण्यात येईल याची सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

नयना गुंडे भा.प्र.से
आयुक्त, आदिवासी विकास
महाराष्ट्र राज्य, नाशिक